# आदिवासी समाजासाठी असलेल्या शासकीय योजनांचा एक अभ्यास : विशेष संदर्भ कळमनूरी तालुका

सहा. प्रा. डॉ. अण्णाजी मडावी
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
आदर्श महाविद्यालय हिंगोली - ४३१५१३

**प्रस्तावना : -**

भारतीय आदिवासी समाज इतर समाजाच्या तुलनेत अनेक बाबतीत मागास असल्याचे दिसून येते. आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास घडून यावा यासाठी देशपातळीवर तसेच विविध राज्य पातळीवर अनेक शासकीय योजना राबविल्या जात आहेत. सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतात आदिवासी समाजाची लोकसंख्या **८.६ टक्के** आहे. भारतात १०.५ कोटी पेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या भारतात आहे. आदिवसी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समूहांना भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जमाती असा उल्लेख करण्यात आला आहे. भारतीय आदिवासी समाजामध्ये अनेक जमाती दिसून येतात. महाराष्ट्र राज्यात आदिवासींच्या एकूण ४७ जमाती आहेत. महाराष्ट्र राज्यातील हिंगोली जिल्ह्यात प्रामुख्याने आंध ही आदिवासी जमात वास्तव्यास आहे. हिंगोली जिल्ह्यात हिंगोली, सेनगाव, वासमत, काळमनूरी आणि औंढा नागनाथ असे एकूण पाच तालुके आहेत. यातील कळमनूरी तालुक्यात आदिवसी समाजाची लोकसंख्या सर्वात जास्त आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार कळमनूरी तालुक्याची एकूण लोकसंख्या २,३१,५५९ एवढी असून यापैकी आदिवासी समाजाची लोकसंखी ४३,५४१(१८.८%) एवढी आहे. त्यामुळे हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाजाचा अभ्यास करण्यासाठी कळमनूरी तालुक्याची निवड करण्यात आली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१) आदिवासी समाजाचा ऐतिहासिक आढावा घेणे.
२) हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाजासाठी कार्यरत असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करणे.
३) हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीचे अध्ययन करणे.
४) हिंगोली जिल्ह्यात विविध आदिवासी योजनांच्या अंमलबजावणीमुळे आदिवासी समाजाला झालेला लाभ पाहणे.

**संशोधनाची गृहीते: -**

१) विविध शासकीय योजनांमुळे हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या आर्थिक परिस्थितीत बदल होत आहे.
२) हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाजाचे राहणीमानात सुधारणा होत आहे.
३) हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या आर्थिक शोषणाचे प्रमाण जास्त आहे.

४) हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाजावर रुढी आणि परंपरेचा मोठा प्रभाव आहे.

५) हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाज विकसित होत आहे.

**संशोधन पद्धती : -**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा (Descriptive Method) उपयोग करण्यात आला आहे. यामध्ये हिंगोली जिल्ह्यातील आदिवसी समाजाच्या संदर्भात असलेले अभ्यासाशी पूरक अश्या प्राथमिक व दुय्यम माहीत संकलन साधनांचा वापर करून संशोधन केले आहे. प्राथमिक स्वरूपाची माहिती संकलन करण्यासाठी आदिवासी व्यक्तीशी व्यक्तिगत संपर्क साधून त्यांच्याकडून २०० मुलाखत अनुसूची भरून घेतली व आवश्यक माहिती संकलित केली. दुय्यम स्वरूपाची माहिती विविध ग्रंथ, शासकीय अभिलेख, शासकीय आकडेवारी, शासकीय अहवाल, नियतकालिके, इंटरनेट इत्यादींच्या माध्यमातून माहिती संकलित करण्यात आली आहे.

**आदिवासीचा अर्थ :-**

आदिवासी समाजाचे अभ्यासक, विचारवंत सामाजिक कार्यकर्ते इत्यादींनी आदिवासींना वेगवेगळ्या नावांनी संबोधले आहे. संयुक्त राष्ट्र संघाने आदिवासींना **'देशज'** असे संबोधले आहे. काही विचारवंतांनी आदिवासींना वनात राहणारे म्हणून **'वनवासी'** हा शब्द वापरला आहे. भारतीय राज्यघटनेत टोळी करून राहणारी जमात म्हणून आदिवासींचा **'अनुसूचित जमाती'** असा उल्लेख केला आहे. हिंदीत 'जनजाति' तर मराठीत 'आदिवासी' हा शब्द वापरला जातो. आदिवासींचा अर्थ त्या-त्या ठिकाणाचे मूळ रहिवासी किंवा मूळ निवासी असा देखील लावला जातो.

**महाराष्ट्रातील आदिवासी :-**

सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतात एकूण आदिवासींची लोकसंख्या १०.४२ कोटी एवढी आहे. त्यापैकी **१०५.१० लाख** आदिवासी लोकसंख्या महाराष्ट्र राज्यात वास्तव्य करते. सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११.२४ कोटी असून त्यापैकी आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण **९.३५** टक्के आहे. आदिवासी लोकसंखेच्या प्रमाणात भारतात महाराष्ट्राचा दूसरा क्रमांक आहे. इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातील आदिवासी समाज हा जंगली, पहाडी, दऱ्याखोऱ्यात व दुर्गम भागात वास्तव्य करतांना दिसते. महाराष्ट्रात सर्वाधिक आदिवासी लोकसंख्या असलेला जिल्हा नंदुरबार असून या जिल्ह्यात आदिवासींची लोकसंख्येचे एकूण लोकसंखेशी असलेले प्रमाण **६९.३०** टक्के आहे.

**हिंगोली जिल्ह्याची सर्वसाधारण माहिती :-**

परभणी जिल्ह्याचे विभाजन होऊन हिंगोली जिल्ह्याची निर्मिती १ जून १९९९ रोजी करण्यात आली. हिंगोली जिल्हा महाराष्ट्रातील मराठवाड्याच्या उत्तरेस आहे. हिंगोली जिल्ह्याला नांदेड, परभणी, वाशिम, जालना, यवतमाळ आणि बुलढाणा या सहा जिल्ह्यांची सीमा लागुण आहे. हिंगोली जिल्ह्याचे क्षेत्रफळ ४,५२६ चौ. की. मी. असून सन २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ११,७७,३४५ एवढी असून साक्षरतेचे प्रमाण ६६.८६ टक्के एवढे आहे. जिल्ह्यातील गोंधळ, शाहिरी, भारूड, पोतराज व कलगीतुरा या लोककला प्रसिद्ध आहेत. ज्वारी व कापूस ही जिल्ह्याची मुख्य पिके आहेत. वसमत तालुक्यातील वाई गोरखनाथ येथील गोरक्षनाथ महाराजांचे

देवस्थान आहे. येथे पौष पौर्णिमेला यात्रा सुरू होते. खुप ठिकणांवरून येथे भाविक येतात. कुरुंदा गावाजवळील टोकाई माता मंदिर,आंबा येथील अंबादेवी मंदिर,बाराशिव येथील हनुमान मंदिर, बोराळा येथील हनुमान मंदिर व चोंडी बहिरोबा येथील बहीरोबा देवस्थान इ. वारंगा मसाई हे गाव हिंगोली पासुन १९ किलोमीटर अंतरावर आहे. आणि तालुका कळमनुरी पासून १० किलोमीटर अंतरावर आहे. हे गाव मसाई माता मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. या गावांमध्ये पौष महिन्याच्या पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी एक मोठी यात्रा भरते. हे गाव तिन्ही बाजूंनी डोंगरांनी घेरलेले आहे. औंढा-नागनाथ हा हिंगोली जिल्हयातील एक गाव व तालुका आहे. याचे प्राचीन नाव आमर्दक. भारतातील पवित्र बारा ज्योतिर्लिंगापैकी आद्य ज्योतिर्लिंग मानल्या जाणाऱ्या नागनाथ (नागेश्वर) मंदिरासाठी औंढा हे गाव प्रसिद्ध आहे. या गावात एकेकाळी आमर्दक सरोवर होते. हे मंदिर एका विस्तीर्ण २९० x १९० फुटी आवारात असून त्याभोवती एक मोठा परकोट आहे. परकोटाला चार प्रवेशद्वारे असून त्यातील उत्तरेकडील प्रवेशद्वारावर नगारखाना आहे. तेच मुख्य प्रवेशद्वार होय. आवारातच एक पायविहीर असून तिचा नागतीर्थ असा उल्लेख केला जातो.

**आदिवासी विकासासाठीच्या काही निवडक योजना :-**

१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प योजना
२) केंद्रवर्ति अर्थसंकल्प न्युक्लिअस बजेट योजना
३) सुधारित क्षेत्र विकास मोहीम (माडा)
४) छोटे सुधारित क्षेत्र विकास (मिनीमाडा)
५) शासकीय शिशवृत्ती योजना
६) आदिवासी युवकांना पोलिस व लष्कर भरतीपूर्व प्रशिक्षण योजना
७) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र - योजना
८) निवासी आश्रम शाळा योजना
९) शासकीय वसतिगृह योजना
१०) शेतकऱ्यांना विजपंप / तेलपांप पुरवठा योजना
११) आदिवासींच्या जमीन सुधारणा कार्यक्रम
१२) पसुधन पर्यवेक्षकासाठी प्रशिक्षण
१३) दशलक्ष विहीर योजना
१४) शबरी आदिवासी घरकूल योजना
१५) प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण)

**आदिवासी कुटुंबाचे शासकीय योजनांचा घेतलेल्या लभानुसार विश्लेषण :-**

**१) शैक्षणिक विकासाच्या योजना** - आदिवासी समाज शैक्षणिक दृष्ट्या अत्यंत मागासलेला असल्याचे दिसून येते. आदिवासी समाजाची शैक्षणिक पातळी उंचावण्यासाठी विविध प्रकारच्या केंद्र सरकार पुरस्कृत तसेच राज्य सरकार पुरस्कृत शैक्षणिक योजना राबविल्या जात आहेत. आदिवासी कुटुंब या योजनांचा लाभ घेत आहेत किंवा नाही याचा आढावा काही निवडक शैक्षणिक योजनांद्वारे खालील तक्ता क्र. १ मध्ये दर्शविल्या प्रमाणे घेतलेला आहे.

3

**तक्ता क्र.१**

**नमूना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे निवडक शैक्षणिक योजनेनुसार केलेले वर्गीकरण**

| अ. क्र. | शैक्षणिक योजना | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | निवासी आश्रम शाळा | १४३ | ७१.५ |
| २ | शिश्यवृत्ती योजना | १५९ | ७९.५ |
| ३ | शासकीय वसतिगृह योजना | १११ | ५५.५ |
| ४ | लाभ न घेतलेले कुटुंब | १५ | ७.५ |
| **५** | **एकूण आधारभूत कुटुंबे** | **२००** | **१००** |

(स्त्रोत - प्रत्यक्ष पाहणी)

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, नमूना पाहणीसाठी निवडलेल्या एकूण २०० कुटुंबापैकी सर्वाधिक १५९ (७९.५ टक्के) आदिवासी कुटुंबे शिशवृत्ती योजनेचा लाभ घेणारे आहेत. त्यानंतर निवासी आश्रम शाळेचा लाभ घेणाऱ्या आदिवासी कुटुंबाची संख्या १४३ (७१.५ टक्के) आहे तर शासकीय वसतिगृह योजनेचा लाभ घेणाऱ्या आदिवासी कुटुंबाची संख्या १११(५५.५ टक्के) एवढी आहे. कोणत्याही शैक्षणिक योजनेचा लाभ न घेतलेल्या कुटुंबाची संख्या १५ एवढी आहे.

**२) आर्थिक उन्नतीच्या योजना** - आदिवासी समाजाचा मुख्य व्यवसाय शेती असून इतर व्यवसाय म्हणून वनावर आधारित व्यवसायावर अवलंबून असतो. आदिवसी समाजामध्ये प्रमुख्याने परंपरागत पद्धतीनेच शेती व्यवसाय केला जातो. अशिक्षितपणामुळे व गरीबीमूळे आदिवासी समाज शेती व्यवसायात फार कमी प्रमाणात आधुनिक साधनांचा वापर करतो. इत्यादि अशा कारणामुळे आदिवासी कुटुंबाचे उत्तपन्नाचे प्रमाण फार कमी असल्याचे दिसून येते. आदिवासी कुटुंबाचे उत्तपन्न वाढावे यासाठी उत्तपन्न वाढीच्या विविध योजना शासकीय पातळीवर राबविल्या जात आहेत. आदिवासी कुटुंब या योजनांचा लाभ घेत आहेत किंवा नाही याचा आढावा खालील तक्ता क्र. २ मध्ये दर्शविल्या प्रमाणे घेतलेला आहे.

**तक्ता क्र.२**

**नमूना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे निवडक आर्थिक उन्नतीच्या योजनेनुसार केलेले वर्गीकरण**

| अ. क्र. | योजनेचे नाव | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दशलक्ष विहीर योजना | ४० | २० |
| २ | विजपंप / तेल पंप योजना | २६ | १३ |
| ३ | पी. व्ही. सी. पाईप योजना | २४ | १२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | लाभ न घेतलेले कुटुंब | १४० | ७० |
| **५** | **एकूण आधारभूत कुटुंबे** | **२००** | **१००** |

(स्त्रोत - प्रत्यक्ष पाहणी)

वरील तक्ता क्रमांक २ वरुन असे लक्षात येते की, नमूना पाहणीसाठी निवडलेल्या एकूण २०० कुटुंबापैकी एकूण ७० टक्के आदिवासी कुटुंबे कोणत्याही योजनेचा लाभ न घेणारे आहेत. २० टक्के आदिवासी कुटुंबे दशलक्ष विहीर योजनेचा लाभ घेणारे, १३ टक्के आदिवासी कुटुंबे विजपंप / तेल पंप योजनेचा लाभ घेणारे तर १२ टक्के आदिवासी कुटुंबे पी. व्ही. सी. पाईप योजनेचा लाभ घेणारे आहेत.

**३) आदिवासी विकसच्या इतर योजना -** शैक्षणिक विकास योजना व आर्थिक उन्नतीच्या योजना बरोबरच इतरही योजना शासकीय पातळीवर राबविल्या जातात. जसे आरोग्य विषयक योजना, राहणिमानात सुधारणा विषयक योजना, सामाजिक सुधारणा विषयक योजना इत्यादी प्रकारच्या शासकीय योजना राबविल्या जात आहेत. या सर्व योजनांचा हेतू हाच आहे की, आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास घडून यावा व हा समाज विकास प्रवाहामध्ये जोडला जावा. काही इतर आदिवासी विकास योजनांचा आढावा पुढील तक्ता क्रमांक ३ मध्ये दर्शविल्या प्रमाणे आहे.

**तक्ता क्र.३**

**नमूना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे निवडक आर्थिक उन्नतीच्या योजनेनुसार केलेले वर्गीकरण**

| अ. क्र. | योजनेचे नाव | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना | १० | ५ |
| २ | प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) | ४० | २० |
| ३ | एकात्मिक बाल विकास योजना | १२० | ६० |
| ४ | शबरी आदिवासी घरकूल योजना | ६४ | ३२ |
| ५ | लाभ न घेतलेले कुटुंब | ७२ | ३६ |
| **६** | **एकूण आधारभूत कुटुंबे** | **२००** | **१००** |

(स्त्रोत - प्रत्यक्ष पाहणी)

वरील तक्ता क्रमांक ३ मध्ये दर्शविलत्या प्रमाणे नमूना पाहणीसाठी निवडलेल्या २०० आदिवासी कुटुंबापैकी सर्वात जास्त १२० कुटुंबे एकात्मिक बाल विकास योजनेचा लाभ घेणारे आहेत. तर शबरी आदिवासी घरकूल योजना ६४ कुटुंबे आणि प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) ४० कुटुंबे अशी लाभार्थी कुटुंबांची संख्या आहे. व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजनेचा लाभ घेणाऱ्या कुटुंबाची संख्या सर्वात कमी १० (५%) एवढी आहे. कोणत्याही योजनेचा लाभ न घेतलेली कुटुंब संख्या ७२ म्हणजे ३६% एवढी आहे.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत संशोधन हे हिंगोली जिल्ह्यातील काळमनूरी तालुक्यातील आदिवासी समाजाच्या अध्ययन संदर्भात आहे. आदिवासी समजाच्या सामाजिक, आर्थिक शैक्षणिक सांस्कृतिक आणि धार्मिक घटकाच्या संदर्भात त्यांच्यातील सामाजिक बदलांची व विविध समस्यांची मीमांसा करण्याचा प्रयत्न या संशोधनात करण्यात आलेला आहे. शासकीय पातळीवरून आदिवासी समजाच्या शैक्षणिक पातळीत वाढ करण्यासाठी वारंवार प्रयत्न होऊनही ४१ टक्के उत्तरदाते कुटुंब आजही निरक्षर आहेत. बहतांश आदिवासी कुटुंबे वर्तमानातही घरातील भौतिक सुख-सुविधापासून वंचित आहेत. आदिवासी समाजात गरीबीचे प्रमाण अधिक दिसून येते. कारण या समाजाकडे उत्पन्नाची साधने कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. नमूना पाहनीतील ७५ टक्के पेक्षा जास्त आदिवासी कुटुंबाना शासकीय योजनांची माहीत नसल्याचे दिसून आले. विविध शासकीय योजनांमुळे आदिवासी समाजातील मुलांचा आणि त्यांच्या पालकांचा शिक्षणाकडे बघण्याच्या दृष्टिकोनात सकारात्मक बदल होत आहे.

**(आभार** (Acknowledgement) :-

प्रस्तुत संशोधनासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नदेड यांच्या कडून लघु शोध प्रकल्प २०२०-२१ अंतर्गत मान्यता देण्यात आली आहे व प्रस्तुत संशोधनासाठी अर्थसाहाय्य केले, त्याबद्दल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नदेड चा आभारी आहे.)

**संदर्भसूची :-**

१) गुरुनाथ नाडगोंडे - 'भारतीय आदिवासी' कॉटिंनेन्टल प्रकाशन पुणे (२००२)

२) डॉ. सौ. शैलजा देवगावकर, डॉ. एस. जी. देवगावकर - 'आदिवासी विश्‍व' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर. (२०१५).

३) डॉ. प्रदीप आगलावे - 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर. (२०१२).

४) डॉ. एस. जी. देवगावकर - 'आदिवासी विकास प्रशासन' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर. (२०१६).

५) डॉ. शौनक कुलकर्णी - 'महाराष्ट्रातील आदिवासी' डायमंड पब्लिकेशन, पुणे. (२००९).

६) https://mahades.maharashtra.gov.in/files/report/PCA_2011_ALL.pdf

७) https://hingoli.nic.in/mr/

८) http://hdl.handle.net/10603/242818

९) https://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%B9%E0%A4%BF%E0%A4%82%E0%A4%97%E0%A5%8B%E0%A4%B2%E0%A5%80_%E0%A4%9C%E0%A4%BF%E0%A4%B2%E0%A5%8D%E0%A4%B9%E0%A4%BE

१०) http://hdl.handle.net/10603/279583